# सूर्य फुटेना क्षितिजाला

१९६०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय क104
सं. क्र. १५30

REFBK-0011262
REFBK-0011262

विजय चिंदरकर

सूर्य फुटेना क्षितिजाला

# सूर्य फुटेना क्षितिजाला

विजय चिंदरकर

REFBK-0011262
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39824 वि: 9105
क्रमांक 1430 नों दि: 13/10/67

किंमत १ रुपया

प्रकाशक :
**आ. ना. पेडणेकर**
(विजय चिंद्रकर स्मारक समितीसाठीं)
साने गुरुजी वाचनमंदिर, मालवण

प्रति ७५०
प्रथम आवृत्ति : जुलै १९६०

फक्त या आवृत्तीचे हक्क प्रकाशकाकडे

पुढील आवृत्तींचे हक्क :
**श्रीमती क्षमा गोपाळ चिंद्रकर**
भरड, मालवण यांजकडे

मुखपृष्ठ : **पद्मा सहस्रबुद्धे**

मुद्रक :
**वि. पु. भागवत**
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, मुंबई ४

कै. विजय चिंदरकर यानें तीनचार वर्षांत लिहिलेल्या आणि शक्यतों कालक्रमानुसार छापलेल्या, ह्या तीस कविता. 'आशय हा सरलेला, शब्दांचा व्यर्थ डौल', याचें भान अधिक असल्यानें मित्रमंडळींतहि साऱ्या कवितांना प्रसिद्धि दिली नाहीं. साहित्य-संमेलनानंतर कविमित्रांच्या संगतींत पुन्हा शब्दकळयांचें वेड लागत होतें. 'मनांतल्या डोहांत खोल खोल बुडायचें' आतांशा कुठें साधत होतें. पण आर्त बोल घुमवण्याआधींच तार अकल्पितपणें तुटली. नियतीच्या ठरलेल्या रेषेनें अंदाजाची कक्षा चुकवली. आतां त्याची भेट कल्पनेंतच व्हायची.

उत्तर रात्रींच्या झुरत्या फिकट चंद्रम्याची कांति ल्यायलेल्या या कवितांच्या ओळींना अनामिक वेदनांचे डंख आहेत, नित्य दुःखाची किनार आहे. 'जगण्याचें हें ओझें उरतें, दुरावतों अन् मीही मजला' अशी दमछाटहि आहे. निराशेंत विसावा दिला तो आई, भावंडें, मित्र, खेळ नि कविता यांनींच.

'कधींतरी संपे अशी सारी ओढ जगण्याची' ही जाणीव उसनी नसावी. तिचा उगम शोधणें मात्र कठीण. बालकवि ठोमऱ्यांप्रमाणें याच्याहि मनीं 'गारठून कण्हणारा एक दीनवाणा पक्षी, अंबराचें वेड वक्षीं' घेऊन होता. जीवनाच्या चौकटींत आभाळ मावत नसल्यानें, सारे दीस जपून वागण्यांत गेल्यानें तो खंत करीत असावा. शेवटीं शेवटीं भरतीच्या उरींची ओहोटीची भीति निवळत होती. 'येते धुंदावून हवा मोहरतें झाड झाड!' (ही बहुधा शेवटची एकुलती एक ओळ.) मूर्ति आकारास येत नसल्याची खंत प्रत्येक इमानी कवीस प्रायः छळते, तिनें इथेंहि पाठपुरावा केला.

'काव्यशक्ति ही विजेसारखी आहे. तिला स्पर्श करूं पाहणाऱ्यांपैकीं शेंकडा ९९ होरपळतात. मी त्या ९९ पैकीं एक आहें.' केशव-

सुतांच्या भावजीवनांतील ही दाहकता या कवीला लौकिक अर्थानेंहि स्पर्शून गेली. कवितेचा केवडा फुलण्याचा ध्यास धरतां धरतां अपघाती मरणाचें गरळ ओकलें गेलें.

आमच्या दुःखास आतां मौनाचीच भाषा. ह्या खिन्न काळ्या रात्रीं हा संग्रहाचा तारा. वाडा उभा राहण्यापूर्वींच विजेनें भग्न केला आहे. या कवीनें ज्यांना अकारण लोभ लावला त्या सर्वांची आतां प्रार्थना एवढीच:

**भंगल्या वाड्यापुढें तुळस तरि रे राहूं दे!'**

भरल्या डोळ्यांचीं निरांजनें आतां वृंदावनाभोवतीं तेवत आहेत.

११ जुलै १९५९ **विजयचे स्नेही**



*विजय गोपाळ चिंदरकर*

*२३ जुलै १९३३ रोजीं जन्म.*

*१९४९ मार्च : एस्. एस्. सी. उत्तीर्ण.*

*दोन वर्षें सिद्धार्थ कॉलेजांत विज्ञानशाखेंत.*

*पोस्टांत नोकरी.*

*मालवण, वेंगुर्ला, कुडाळ, रत्नागिरी या ठिकाणीं वास्तव्य.*

*ह्याच कालावधींत कवितालेखन.*

*'गोल्डन स्पोर्ट्स्'चे एक सदस्य.*

*११ जुलै १९५९ रोजीं संध्याकाळीं मालवण येथें*

*विजेच्या तारेच्या धक्क्यानें.*

*पंचविसाव्या वर्षी मृत्यु.*

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम 31224 वि: ३/०५
क्रमांक 9430 नों: दि: 23/90

# काजळलेल्या ढगाढगांनीं

काजळलेल्या ढगाढगांनीं
निळ्या नभाला झांकाळावें
निळी आठवुन ती नवलाई
मनीं नभानें झुरत बसावें...

सळसळणाऱ्या संथ लयीचा
वाऱ्यालाही साज असावा
चैतन्यांतिल बेहोषीचा
लाटांच्या उरिं कैफ चढावा...

चार दिसांच्या नश्वरतेला
रानफुलांनीं खिजवुन जावें
'मातीलाही असतो आत्मा'
तृणपर्णानें मनीं म्हणावें...

कोसळणाऱ्या चिंब सरीनें
अलगद भूमीला चुंबावें
काळोखाच्या जगीं कुणी अन्
अंकुरण्याचें स्वप्न पहावें...

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११२६२

## हवी होती तुझी साथ

पुनवेच्या चंद्रालाही
आठवण ग्रहणाची
कळाकळा झिजूनिया
रात्र उरे अंधाराची.

कधींतरी संपे अशी
सारी ओढ जगण्याची
भरतीच्या लाटेलाही
भीति उरीं ओहोटीची.

सुख भारावून बसे
गाणीं वेदनेचीं गात
अशा दमछाटी–वेळीं
हवी होती तुझी साथ.

## आईनें अन् चिडून जावें

पानावरती भात हवा पण
हवाच उकडा कठिण तांबडा
सोबतिला अन् हवा भाजुनी
दरवळलेला सुका बांगडा.

गडग्यापाशिल फणसाची अन्
हवीच भाजी गोडुस पिवळी
हवी आणखी तिखट तांबडी
चटणी थोडी भाजीजवळी.

हा सारा हा थाट हवा अन्
हवींच सगळीं अंवतीभंवती
सोलकढीची हवी भैरवी
तृप्तीच्या त्या तानेवरती.

खूप दिसांनीं भूक शमावी
त्या प्रेमाच्या शब्दावरती
आईनें अन् चिडून जावें
माझ्या थोड्या खाण्यावरती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 39024 विः काव्य
क्रमांक 9430 नोंः दिः 93/70/5

## ह्या जखमेचा कैफ चढावा

केवळ स्वप्नच पहायचें तर
हवे कशाला उघडे डोळे
विसरायाचें सारें आहे
हवे कशाला भावहि भोळे ?

केवळ कबरीस्तव अश्रूंच्या
हवी कशाला तुझीच मूर्ति ?
उमलायाचें फूल कशाला
निर्माल्यांतहि नाहीं पूर्ति.

निर्माल्यांतहि नाहीं पूर्ति
पण फुलण्याचा ध्यास जडावा
एकाकी अन् कधिं उरल्यावर
ह्या जखमेचा कैफ चढावा.

# आतां

सारें कांहीं संपवून
आतां फक्त कल्पनेंत
आतां गेली आहे लाट
कधींतरी व्हावी भेट

मूक ओढ डोळ्यांतील
आतां रात्र मनाशींच
नाहीं आतां कळायची
वेदनेंत जळायची

छेडायच्या आधींच ही
तिचे आर्त बोल आतां
तुटलेली आहे तार
फक्त मनीं घुमणार

आतां मनींच्या भावना
काजळलेल्या ढगाला
मनाशींच ठेवायच्या
कडा रुपेरी रेखाव्या

घडलेल्या कहाणींत
अंधारल्या रात्रीला या
सुख आतां मानायचें
पुरे तेज तारकांचें !

## उत्तररात्रीं

उत्तररात्रीं फिकट चंद्रमा
मनांत केवळ झुरतो आहे
नदीकिनारीं लाटांच्या मुखिं
एक हुंदका फुटतो आहे...

ह्या इथल्या अन् चांफ्याच्या उरीं
कळ कसलीशी उठते आहे
माड खुणेचा विसरुन गेला
चुडत तरी तडफडतें आहे...

मुकी बिचारी हळवी पोफळ
मनांत केवळ कुढते आहे
तृणपर्णांवर हलके आतां
अश्रूंचें दंव जमतें आहे...

पुन्हां एकदां इथें आणखी
मार्ग अभागी वळतो आहे
उत्तररात्रीं फिकट चंद्रमा
मनांत केवळ झुरतो आहे...

## जखम ओली

अंत दे दुःखास ह्या अन्
    अश्रुला जाणीव दे
संपलेल्या स्वप्नास ह्या
    पाकळ्यांचा गंध दे...
भावनांच्या पत्थरा रे
    नामस्पर्शें उद्धरूं दे
खिन्न काळी रात पसरे
    एक तारा रे उरूं दे...
वाळवंटीं चालतांना
    रे जलाचा भास दे
भंगल्या वाड्यापुढें ह्या
    तुळस तरि रे राहुं दे...
शुष्क वेड्या जीवनीं ह्या
    जखम ओली राहुं दे...

## शपथ

त्या रात्रीं तूं म्हटलें होतें
नक्षत्रांची शपथ घालुनी
ह्या वळणावर वळल्यावरती
नकोस पाहुंस मागें वळुनी...

अजुन रात्र ही जागत बसते
नक्षत्रांच्या जखमा घेउनि
अमर दुःख अन् झालें माझें
त्या शपथेंतिल जहर प्राशुनि...

## मज आवडते

मज आवडते
रीत अशी स्वप्नाची
फक्त दुरून हसण्याची
वाट युगें बघण्याची...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99262
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

मज आवडते
रीत तुझ्या प्रीतीची
फक्त मनीं झुरण्याची
स्वप्नीं भेटायाची...

मज आवडते
प्रीत अशी जळण्याची
हळू उरीं कळण्याची
जीत अशी हरण्याची...

मज आवडते
प्रीत अशी जखमांची
फक्त मनीं पुजण्याची
मौनांतिल गंधाची...

मज आवडते
रीत अशी क्षितिजाची
फक्त कल्पनेंत जिथें
नभ धरतीला भेटे

## हसलिस तूं अन्

कधीं नव्हे ती हसलिस तूं अन्
लक्ष चांदण्या मनांत फुलल्या
अवचित विसरुन मलाच मी अन्
तमांत हलके ज्योती झुलल्या...

कधीं नव्हे ती हसलिस तूं अन्
फिरुन मनाला भरती आली
तहानलेली वाळु किनारीं
चिंब चिंब अन् भिजूं लागली

कधीं नव्हे ती हसलिस तूं अन्
कळी कळी ग फुलूं लागली
वाटेवरची एक खूण अन्
अक्षय आतां हिरवळलेली !

## तुझी रीत

कधीं नाहीं आलीस तूं
सुख माझें पहायला
तुला हवे माझे अश्रू
तुझ्या नेत्रीं वाहायला...

रंगविल्या नाहींस तूं
मीलनाच्या चांदराती
दूर करण्या तिमिरा
लाविल्या तूं जीव-ज्योती...

नाहीं ओठ बोलून तूं
चुकूनही दाविलीस
फक्त माझ्या सुखासाठीं
कण कण झिजलीस...

कांटेरी ह्या वाटेवर
घालितेस पायघडी
अशी रीत असे कां ग
कशी म्हणूं तुला वेडी ?

कधीं नाहीं आलीस तूं
सुख माझें पहायला
तुला हवे माझे अश्रू
तुझ्या नेत्रीं वाहायला

आणि एक अश्रुबिंदू
माझ्या मनीं रेंगाळला
लाख मोलाचें मोतीं ग
क्षण-क्षुद्र शिंपल्याला !

## शापित दुबळा

जेव्हां इथला संधिप्रकाशहि
उदास फिक्कट किंचित काळा
उगाच एका सायंकाळीं
हळु तेजाळुन होइ आगळा...

वाऱ्यावरती हलके फुलुनी
जेव्हां चढती ढग पूर्वेला
उरांत त्यांच्या ओली जाणिव
आश्वासन अन् अणूअणूला...

अशाच वेळीं हटतो पडदा
अज्ञाताच्या क्षितिजावरला
खूण तुझी जरि पटते आहे
शापित मी पण असाच दुबळा !

११२६२

## वेड

आसुसलेला रुमड मनाशीं
जपतो आहे फूल कधींचें
भोळा पिंपळ हळहळतो अन्
मार्दव पाहुन जुइ-पुष्पांचें...

शहारतो कधिं माड स्वतःशीं
पाहुन लोभस पान अळूचें
आर्त उराशीं जरि कोकिळ हा
गीत हवें पण त्यास ऋतूचें...

केव्हांपासुन केळीच्या मनिं
हळु लिंबाला स्पर्शायाचें
मुइचंपक अन् मिटून डोळे
पाहत आहे स्वप्न उद्यांचें...

आतुरतेनें आंबा बघतो
नवें रोपटें पानवेलिचें
जरि जपतों तव मौनवेलही
वेड मला परि शब्दकळ्यांचें !

## डोह

नजरेंतिल फसवा कांठ
किति जपून चालायचें
कधिंतरी नकळत
परी पाऊल चुकायचें...

आणि बुडायचें डोहीं
मनांतल्या खोल खोल
आठवतां संथ लाट
राहील ना तुझा तोल ?

## पुनश्च जागे राधा वेडी

आत्म्यालाही भोवळ यावी
तुरुंग इथला पाहुन भीषण
कुंडलिनीची अमाप शक्ति
सरली आहे केव्हांपासुन...

सातसागरां ओलांडुनही
कधींतरी परि येतो कानीं
नाद मोहना, तव मुरलीचा
विमुक्त-कंपित जीवकहाणी !

आणि मनींच्या गोकुळांतली
पुनश्च जागे राधा वेडी
भरतीच्या लाटेस रोधते
अगस्तिच्या हांकेची बेडी !

# झुरे किनारा

रुक्ष कोरड्या मार्गावरती
पसरणार तूं होतिस छाया
जेव्हां होउन आली होतिस
निळावंतिची अमाप माया...

तव लाटेच्या खुणेपुढेंही
कमनशिबी हा झुरे किनारा
जिथें पेटलें घर हें सारें
अपुल्या केवळ अश्रूधारा...

पाहुन हें तूं गेलिस मागें
गेलिस मागें दुःख न याचें
वळुन एकदां पाहतीस तर
जपले असते कण स्वप्नांचे...

## माझ्या मनीं

सूर्य भोगतसे पाणी
सात रंगांच्या हातांनीं
वारा स्पर्शतो जमीन
दाही दिशांना भरूनी...

चंद्र झुरे एकलाच
कळा कळा झिजवूनी
शुक्र त्यजितो आभाळ
अर्धी रात्र रंगवूनी...

माझ्या मनीं मात्र कांहीं
सारें राहतें व्यापुनी
भोग-त्यागाच्याही पुढें
शब्द राहती अडूनी...

## आतां दूर जातेवेळीं

सारे दीस गेले असे
जपूनियां वागण्यांत
मेघ आले काळे काळे
नाहीं झाली बरसात...

फूल देवा चढवीलें
नाहीं मिळालेला कौल
दोघांनींही जपलेलें
कांहीं उरीं खोल खोल...

आतां दूर जातेवेळीं
एक शब्द चुकशील
इथें रुक्ष वाळवंटीं
तेवढीच हिरवळ...

## डंख

रात्र तारे व्याली
त्यांना पश्चिमेचा ध्यास
प्रीत वंचिलेली
तिला वेदनेचा श्वास
रूप कोरलेलें
पण पत्थराचें मन
वेल नाजुकशी
तिला फुलें गंधहीन
कांहीं आठवावें तर
लाख वेदनांचे डंख
कांहीं विसरावें तर
चुकतील स्वप्निल पंख

# पराभव अटळची

पराभव अटळची
पण लढायची सक्ती.
अर्धी श्रद्धा भंगलेली
अर्घ्यासाठीं हवी भक्ती.

सारें नको वाटे तरी
हीच उरली चाकोरी.
येथें दुबळ्या जीवास
लढायची झाली चोरी

सारें मुक्यानें पाहीन
एवढेंच दे उत्तर—
माझ्या सुखालागीं कां रे
नित्य दुःखाची किनार ?

## नकोच उत्तर

ह्या प्रश्नाला नकोच उत्तर
नियतीची ठरलेली रेषा
देठालाही आधीं कळते
गंधामधली आतुर भाषा...

इथेंच अंधाराला होतें
ब्रह्मांडाचें थोडें दर्शन
ह्या स्वप्नाला नकोच शेवट
उद्यांची वा खुळी भुलावण...

ह्या दगडाला नको कळाया
शिल्पामधली दैवी शक्ती
माळाच्याही भाळीं रुजते
रानफुलांची हळवी भक्ती...

ह्या प्रश्नाला नकोच उत्तर
नियतीची ठरलेली रेषा
ह्या दुःखाला फुटेल आतां
मौनामधली अक्षय आशा...

# आतांच कोठें

आतांच कोठें
आकाशवेलीला
फुटते आहे
थेंबाची पालवी
आतांशी कोठें
हलक्या हातांनीं
मातीनें माळला
धुंद वळेसर
पागोळ्यांचें गीत
आतांच छेडितें
उरींच्या भावना...
येत आहेस तूं
स्मृतींच्या धारेंत
चिंब भिजलेली !

## कोरडें मरण

डोळ्यांची रापण
हसून फेकली
स्वप्नांची मासोळी
फसलेली...

भाबड्या भक्तीच्या
नशिबांत पण
कोरडें मरण
किनारींचें...

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 39024 वि: 03/04
क्रमांक 1430 नों: दि 23/10/61

## देवचार

देवचार उन्हाचाच
चुके त्याचें देवपण
ऐन मिरगाच्या वेळीं
घालितसे हा थैमान...

लेकुरवाळ्या मातीला
हवी होती ओली धार
परी वेड्यापरी ओती
वरुनियां हा विखार...

सात दुष्ट हातांनीं हा
बळी घेई तान्ही ओल
ह्याच्या तापल्या रागांत
दिशांचाही सुटे तोल...

ह्याच्या उलट्या पायांनीं
जळे भोळें आर्त पाणी
सागराचा सुटे धीर
ह्याचीं फेडितांना देणीं

उन्हाचा हा देवचार
चुके याचें देवपण
माझ्या मनीं जन्मतसे
कोंभाकोंभाचें मरण !

## आज

आसुसलेला रुमड मनाशीं
आज जपतसे फूल कधींचें.
रानससशाला उगाच वाटे
डोक्यावरतीं शिंग यायचें...

वेडा चातक प्राशूं बघतो
ढग नसतांना थेंब मृगाचे
चक्रवाक नच रात्रीं व्याकुळ
कमलपत्रही दूर व्हायचें...

अंदाजाची चुकते कक्षा
अशक्यतेचा नेमही हुकतो
अबोलिचा तो गोड वळेसर
आज कांहींसें हसुन बोलतो...

## तेव्हांपासून

तूं जेव्हां हसलिस
तेव्हां...
माझ्या मनांतील
वासनेच्या कुरूप दरीनें
स्वतःशींच शरमून
स्वप्निल धुक्याची
तरल ओढणी
ओढुन घेतली.
तेव्हांपासून
तुझेंच पूजन चालू आहे !

# ओलें गीत

पागोळ्यांच्या ओठीं उरे
सरींचेंच ओलें गीत
झाड निथळल्या अंगें
बसे कांहीं आठवीत...

दूर क्षितिजाला आतां
ढगाचेंच स्वप्न पडे
कुठें पत्थराचें मन
शेवाळाच्या मागें दडे...

डोळ्यांमध्यें दिवास्वप्न
अंबराचें वेड वक्षीं
मनीं गारठून कण्हे
दीनवाणा एक पक्षी...

# ओझें

जेव्हां फिक्कट सायकाळीं
भरून येतें मनहि नभाचें
झाडांनाही नकोच वाटे
तेव्हां मीलन त्याच सरींचें...

पानें सारीं मुकाट होती
घाव कपाळीं ह्या थेंबांचा
हळूच कोठें वितळूं लागे
बर्फ उदासिन अंधाराचा...

आठवणींच्या कोठीपुढती
बसुन राहते डंखिण वेडी
आणि हवें तें सारें टाकुन
नको नको तें पुढ्यांत ओढी...

जगण्याचें हें उरतें ओझें
दुरावतों अन् मीही मजला
विरूं लागतें मीपण सारें
अर्थ न उरतो ह्या असण्याला !

## झोळी

देणाऱ्यानें सारें दिलें
घेणाऱ्याला दोन हात.
आभाळही मावेनाच
जीवनाच्या चौकटींत.

तुझें रूप पाहायला
पुरेनात दोन डोळे
सारें दुःख सांगायाला
नाहीं अश्रू उरलेले...

असे बोल ऐकायाला
हवे होते लक्ष कान
गीत सगळें कां गाशी ?
मला पुरे एक तान.

जलवेड्या शिंपल्यास
नको मिळायाला मोतीं
माझी झोळी फाटलेली
तुझें दान तुझ्या हातीं !

## सूर्य फुटेना क्षितिजाला

फुले केवडा कुठें बनांतुन
तोंच ओकतो गरळ कुणी
मेघांना अन् शिवेनाच कधिं
केकांमधला आर्त ध्वनि...

दुरून मीही हलके विणतों
ह्या नजरेचे गोफ इथें...
धागाधागा शापित आणि
जीवन सारें होत रितें...

निर्माल्यें हीं जमवुन सारीं
बांधियला मी गाभारा
विझे वात अन् उरे काजळी
मूर्ति येत ना आकारा...

उद्यांवरती मान टाकुनी
जोजविलें मी रात्रीला
उजाडलें हें केव्हांपासुन
सूर्य फुटेना क्षितिजाला...

REFBK-0011262
REFBK-0011262

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११२६२

## सूर्य फुटेना क्षितिजाला

फुले केवडा कुठें बनांतुन
तोंच ओकतो गरळ कुणी
मेघांना अन् शिवेनाच कधिं
केकांमधला आर्त ध्वनि...

दुरून मीही हलके विणतों
ह्या नजरेचे गोफ इथें...
धागाधागा शापित आणि
जीवन सारें होत रितें..

निर्माल्यें हीं जमवुन सारीं
बांधियला मी गाभारा
विझे वात अन् उरे काजळी
मूर्ति येत ना आकारा...

उद्यांवरती मान टाकुनी
जोजविलें मी रात्रीला
उजाडलें हें केव्हांपासुन
सूर्य फुटेना क्षितिजाला...

REFBK-0011262
REFBK-0011262
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ११२६२

सूर्य फुटेना क्षितिजाला